माहिती तंत्रज्ञान विभाग
दिनांक :- २६ जुन, २०२१

**विषय :- मोफत दर्शनपास (Time Base) कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामी संगणके व संगणकीय साहित्य खरेदी करणेसाठी ई-निविदा प्रक्रियेस प्रथम वेळेस ०७ दिवस मुदतवाढ देणेबाबत....**

**संदर्भ :-** ०१. दि.२७.०५.२०२१ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये अंदाजे खर्चास व ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मा.तदर्थ समितीची चक्रिय पद्धतीने मान्यता.
०२. ई-निविदा राबविणेस प्रशासकीय मान्यता मिळणेकामीची दि.१५.०६.२०२१ रोजीची मंजुर टिपणी.
०३. दि.२५.०६.२०२१ रोजीची स्पष्टीकरण/शुद्धीपत्रक प्रसिद्ध करणेकामीची मंजुर टिपणी.
०४. mahatenders.gov.in या वेबसाईटवरील दि.२६ जुन, २०२१ रोजीचा रिपोर्ट.

सेवेशी सादर,

साईभक्तांच्या होणा-या गर्दीचे नियोजन करणेसंदर्भात दर्शनरांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणाली मे.त्रिलोक यांनी कळविलेप्रमाणे कार्यान्वीत ठेवणेस ते असमर्थ ठरल्यास, सदरची प्रणाली मे.टिसीएस यांचेमार्फत विकसीत करुन संस्थानमार्फत कार्यान्वीत करणेकामी, संगणके व संगणकीय साहित्य प्रचलीत पद्धतीने खरेदी करणेसाठी व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १२,१८,०७०/- + कर मात्रचे खर्चास दि.२७.०५.२०२१ रोजीचे टिपणीअन्वये मा.तदर्थ समितीची चक्रिय पद्धतीने मान्यता घेणेत आलेली आहे. त्यानुसार ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी इकडील विभागाचे संदर्भ क्र.०२ चे मंजुर टिपणीअन्वये, दि.१८.०६.२०२१ ते दि.२६.०६.२०२१ या कालावधीत ई-निविदा प्रसिद्ध करणेत आलेली आहे. ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत ऑनलाईन प्री-बीड मिटींगमध्ये पुरवठाधारकांनी उपस्थित केलेले तसेच ई-मेलद्वारे प्राप्त झालेले मुद्दे/शंकांचे स्पष्टिकरण/शुद्धीपत्रक संदर्भ क्र.०३ चे मंजुर टिपणीअन्वये mahatenders.gov.in तसेच संस्थानचे sai.org.in ह्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आले आहे.

सदर ई-निविदा प्रक्रियेस निविदा सादर करणेच्या (दि.२६.०६.२०२१ रोजीच्या) अंतीम तारखेपर्यंत एकाही निविदाधारकांनी ई-निविदा अपलोड केलेली नसल्याचे संदर्भीय वेबसाईटवरील संदर्भ क्र.०४ चे रिपोर्टवरुन आढळून आलेले आहे.

दर्शनरांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामी संगणके व संगणकीय साहित्य प्रचलीत पद्धतीने खरेदी करणेसाठी प्रसिद्ध करणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत ई-निविदा सादर करणेचे कालावधीत आवश्यक निविदा प्राप्त न झाल्याने, खरेदी नियमावली मुद्दा क्र.४.४.३.१ - **निविदा कालावधीस मुदतवाढ - "निविदा स्पर्धात्मक होण्यासाठी कमीत कमी तीन निविदाकार असणे आवश्यक आहे. तीन पेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्यास, संबंधीत खरेदी अधिका-याने प्रथम किमान एक आठवड्याची मुदतवाढ द्यावी. अशी मुदतवाढ दिल्यानंतर देखील तीन पेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास दुस-यांदा एक आठवड्याची मुदतवाढ द्यावी. त्यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येऊ नये."** यास अधिन राहून सदर ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निविदा सादर करणेस प्रथम वेळेस कार्यालयीन वेळेत पुढील ०७ दिवस (दि.२७.०६.२०२१ ते दि.०५.०७.२०२१) मुदतवाढ देणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

(डॉ.आकाश किसवे)
**प्रशासकीय अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

**प्रत :- माहितीस्तव सविनय सादर**

१. मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी सो., यांचे स्विय सहाय्यक
२. सी.सी.टिव्ही (ई-निविदा) कंट्रोल सेल विभाग
३. स्थळप्रत.

D:\Purchse\DMS Infrastructure\Tender Extension.docx 6/25/2021